महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहसंचालक
संवर्गातील अधिकारी यांच्या बदलीबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग,**
शासन आदेश :- संलेको २०१/प्र.क्र. ८५/ कोषा प्रशा- २
मंत्रालय, मुंबई- ४०००३२, दिनांक:- २४ ऑगस्ट, २०१८.

वाचा :- वित्त विभाग, शासन आदेश क्र. संलेको २०१८/ प्र.क्र. ६७/कोषा प्रशा- २, दि. १७/५/२०१८

**-: शासन आदेश :-**

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहसंचालक संवर्गातील खालील विवरणपत्रात नमूद अधिकारी यांनी अंशत: बदलाची / पदस्थापनेची / महसुली विभाग बदलीची विनंती केली आहे.

२. श्रीमती राजश्री मिलिंद राऊत यांची संदर्भाधीन आदेशान्वये, सहसंचालक (प्रशासन), संचालनालय लेखा व कोषागारे, मुंबई या पदावर बदली करण्यात आली आहे. वैयक्तीक कारणास्तव त्यांची बदलीच्या पदस्थापनेत अंशत: बदल करण्याची विनंती केली आहे.

३. श्री. वैभव राजेघाडगे, उपसचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांच्याकडे असलेल्या १५ व्या वित्त आयोगाचे कामकाज संपत असल्याने, अन्यत्र पदस्थापना देण्याची विनंती केली आहे.

४. श्री. गिरीश नामदेव देशमुख, सहसंचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांनी सा.प्र.वि. शासन अधिसुचना, दि. २८/४/२०१५ मधील तरतुदीनुसार महसुली विभाग बदलीची विनंती केली आहे. त्यानुसार त्यांचा सध्याचा कार्यरत कोकण महसुली विभाग बदलून नाशिक विभाग वाटप करण्यास मान्यता प्राप्त झाली आहे. त्यांना नाशिक महसुली विभागात पदस्थापना देणे आवश्यक आहे.

५. उपरोक्त तिन्ही अधिकाऱ्यांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने या आदेशान्वये, महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार त्यांची खालील विवरणपत्रात स्तंभ क्र. ४ मध्ये नमुद पदावर बदली करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिका-याचे नाव | संदर्भाधीन आदेशान्वये दिलेली पदस्थापना / सध्याचे कार्यरत पद व ठिकाण | बदलीचे पद व कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्रीमती राजश्री मिलिंद राऊत | सहसंचालक (प्रशासन), संचालनालय लेखा व कोषागारे, मुंबई (दि. १७/५/२०१८च्या आदेशान्वये) | उपसचिव (मदत व पुनर्वसन), महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई. |
| २ | श्री. वैभव राजेघाडगे | उपसचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई | अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, बांद्रे, मुंबई |

| अ. क्र. | अधिका-याचे नाव | संदर्भाधीन आदेशान्वये दिलेली पदस्थापना / सध्याच्या कार्यरत पद व ठिकाण | बदलीचे पद व कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| ३ | श्री. गिरीश नामदेव देशमुख | सहसंचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई (कोकण विभाग) | सहसंचालक, स्थानिक निधी लेखा, नाशिक विभाग, नाशिक (नाशिक विभाग) |

६. उपरोक्त अधिकारी यांना बदलीच्या पदावर हजर होण्याकरीता स्थानिक व्यवस्था करून त्यांच्या नियंत्रक अधिकाऱ्यांनी तात्काळ कार्यमुक्त करावे.

७. उपरोक्त अधिकारी यांनी कार्यमुक्त झाल्यानंतर बदलीच्या पदावर तात्काळ हजर व्हावे. बदलीच्या पदावर हजर होताच संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई आणि शासनास अवगत करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(माधवी गांधी)
अवर सचिव, वित्त विभाग.

प्रति,

१) महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर.*
२) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई.
३) संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण भवन, नवी मुंबई.*
४) मा. मुख्यमंत्री / मा. मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) प्रधान सचिव (ले व को) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.*
६) संबंधित अधिकाऱ्यांचे सध्याचे कार्यालय प्रमुख.*
७) संबंधित अधिकाऱ्यांची बदली झालेल्या कार्यालयाचे प्रमुख *
८) संबंधित अधिकारी*
९) निवडनस्ती कोषा प्रशा- १ व २ वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

(* संचालक, ले व को, संचालनालय, मुंबई यांचेमार्फत )